# **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६१व्या बैठकीचे कार्यवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०२ मार्च, २०१९ (शनिवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ४.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. डी.के.जैन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठीया | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |
| श्री. लोकेशचंद्र<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ. सोनिया सेठी
अति.महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बी.जी.पवार
सह महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्री. संजय वाघमारे
संचालक (प्रणाली) (अ.का.),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रविण किडे
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा.भा. गाडगे,
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती के.विजयालक्ष्मी
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि.न.कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा.म.गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दे.स.पाटोळे
प्रशासकीय अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय कृ.नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या २६०व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या २६०व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या मेट्रो मार्ग-७ {(अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)} करिता संकर्षण (Traction) व पूरक विद्युत प्रवाह व पर्यवेक्षीय नियंत्रण व माहिती संपादन (SCADA) या कामांची रचना, पडताळणी, पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वयन करणे (पॅकेज क्र. सीए-५८) या कामाकरिता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या मेट्रो मार्ग-७ {अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)} करिता संकर्षण (Traction) आणि पूरक विद्युत प्रवाह आणि पर्यवेक्षीय नियंत्रण व माहिती संपादन (SCADA) या कामांची रचना, पडताळणी, पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वयन करणे या कामाकरिता मेसर्स लार्सन अँड टुब्रो लिमिटेड यांनी सादर केलेली लघुत्तम दराची समतुल्य रक्कम रूपये १४४,११,०३,४०६.००/- (अक्षरी रूपये एकशे चव्वेचाळीस कोटी अकरा लाख तीन हजार चारशे सहा मात्र) एवढ्या किंमतीची निविदा, जी अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १०.९३% जास्त (जीएसटी, कस्टम ड्युटी आणि इतर कर वगळता) असून निविदेचे दर व्यावहारिक, वाजवी व काम करण्यायोग्य तसेच व्यवहार्य असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

३.२ सदर निविदेचे दर प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकापेक्षा १०.९३% अधिक असून, डीएमआरसी द्वारा दिनांक ०९.१०.२०१८ रोजी स्विकृत दर जे की, अंदाजपत्रकापेक्षा ६.९९ टक्के अधिक होते त्यामुळे सदर निविदाकाराचे दर तुलनात्मक रास्त आहेत.

..४/-

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला आहे :-**

**ठराव क्र.१३७० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्गिका-७ वरील संकर्षण (Traction) आणि पूरक विद्युत प्रवाह आणि पर्यवेक्षिय नियंत्रण व माहिती संपादन (SCADA) (पॅकेज क्र.सीए-५८) या कामाकरिता मेसर्स लार्सन टुब्रो लिमिटेड यांनी सादर केलेली लघुत्तम दराची समतुल्य रक्कम रुपये १४४,११,०३,४०६.००/- (अक्षरी रुपये एकशे चव्वेचाळीस कोटी अकरा लाख तीन हजार चारशे सहा मात्र) एवढ्या किंमतीची निविदा, जी अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १०.९३% जास्त आहे. (जीएसटी, कस्टम ड्युटी आणि इतर कर वगळता) व तो स्विकारण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ व उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्ल्याजवळील सहा पदरी पुलाचे उर्वरित बांधकाम करणे (ई-निविदा क्र.०००१४७६) — या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणे.**

४.१. महानगर आयुक्त यांनी सदर कामाची पार्श्वभूमी विषद करताना असे सादर केले की, विषयांकित काम हे २४ महिन्यांच्या कालावधीमध्ये रु.७५.७२ कोटी इतक्या कंत्राटीय किंमतीमध्ये काम पूर्ण करण्यासाठीचा कार्यादेश दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंत्राटदारास निर्गमित करण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दिनांक ०९ मे, २०१७ रोजीच्या सुधारीत ना हरकत प्रमाणपत्राद्वारे नौकावहन गाळयांची लांबी वाढविल्यामुळे सदर पुलाच्या संरचनेमध्ये बदल करावा लागला. त्या अनुषंगाने सदर पुलाची सुधारीत संरचना मंजूर करण्यात आलेल्या दिनांक १२ जून, २०१७ पासून काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३१ मे, २०१९ पर्यंत वाढवून देण्यात आला. मात्र, सदर कंत्राटदार त्याच्या आर्थिक अडचणीमुळे माहे ऑक्टोबर,२०१८ पर्यंत कामाची अपेक्षित प्रगती ५४.८५% इतकी करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात फक्त १९.२८%

इतकीच प्रगती करु शकला. त्यामुळे कंत्राटीय तरतुदीप्रमाणे सदर कंत्राटदारास कामाची अपेक्षित प्रगती करण्यासंबंधी विविध सुचना पत्र देऊन अंतिमत: दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी सदर कामाचे कंत्राट रद्द करुन सदर काम त्यांच्याकडून काढून घेण्यात आले आणि उर्वरित काम करण्यासाठी नविन निविदा मागविण्यात आल्या. प्राधिकरणाच्या सदर कारवाईवर मनाई आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी सदर कंत्राटदाराने उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. तथापि, प्राधिकरणाच्या प्रयत्नामुळे सदर कारवाईवर उच्च न्यायालयाने मनाई आदेश दिलेले नाहीत. याबाबतचा तत्कालिन सद्य:स्थिती अहवाल कार्यकारी समितीच्या मागील २६०व्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता.

४.२. अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी कार्यवाही करण्यात आलेल्या ई-निविदा पद्धतीबद्दल माहिती देताना असे सादर केले की,

अ) विषयांकित काम मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया लि. यांचेकडून काढून घेण्यात आले असल्याने सदर कंत्राटीय करारामधील अटी, शर्ती व दर कायम राखून तुलनात्मक निविदा प्राप्त करणे आवश्यक ठरल्याने सन २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित असलेल्या व वस्तू-सेवा कर इत्यादीचा समावेश नसलेल्या मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया लि. यांच्या मंजूर दरानुसार उर्वरित कामाची रु.६१,३३,२४,४३०/- इतकी अंदाजपत्रकिय किंमत (वस्तू व सेवाकर शिवाय) निश्चित करुन नविन कंत्राटदार नेमण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. त्या अनुषंगाने विशेष तांत्रिक कामासाठी निविदेमध्ये विहित केलेले निकष पुर्ण करणाऱ्या ३ निविदाकारांकडून स्पर्धात्मक निविदा प्राप्त झाल्या.

ब) निविदा समितीच्या आयोजित करण्यात आलेल्या दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजीच्या पहिल्या बैठकीमध्ये इच्छूक ‘३’ निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे प्रकल्प सल्लागाराकडून तयार करण्यात आलेला पात्रता पडताळणी अहवाल स्विकारण्यास व त्यानुसार पात्र ठरलेल्या सर्व ‘३’ निविदाकारांचा ई-आर्थिक देकार (ई-लिफाफा सी) उघडण्यास मान्यता देण्यात आली.

क) ई-आर्थिक देकार (ई-लिफाफा सी) उघडण्यात आल्यानंतर मे.टी ॲण्ड टी इन्फ्रा मर्यादित या निविदाकाराने सादर केलेला रु.१२५,००,००,०००/- (वस्तू व सेवाकर सहित) इतक्या किंमतीचा देकार प्रथम लघुत्तम ठरला. तथापि, सदर देकार हा निविदेमध्ये नमूद केलेल्या किंमतीपेक्षा अधिक्याचा असल्यामुळे सदर प्रथम लघुत्तम निविदाकारास सदर आर्थिक देकाराची

कारणमिमांसा व सदर आर्थिक देकाराची किंमत कमी करण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यास सकारात्मक प्रतिसाद देवून प्रथम लघुत्तम निविदाकाराने सुरुवातीला रु.१०३,५०,१६,०००/- व अंतिम प्रयत्नात रु.१०१,७०,००,०००/- इतक्या कमी केलेल्या किंमतीचा आर्थिक देकार कारणमिमांसेसह सादर केला.

४.३. प्रथम लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेली कारणमिमांसा व प्रकल्प सल्लागारांनी त्या अनुषंगाने सादर केलेली शिफारस ही बहुतांशी मान्य करण्यासारखी असल्याचे मुद्देनिहाय चर्चेनंतर निविदा समितीचे मत झाले. निविदा समितीच्या चौथ्या बैठकीमध्ये करण्यात आलेल्या मुद्देनिहाय चर्चेनुसार, खालील बाबींची निविदा समितीने नोंद घेतली :-

अ) रु. ६१,३३,२४,४३०/- ही निविदा सुचनेमध्ये नमूद केलेली अंदाजपत्रकीय किंमत, अंशत: काम केलेल्या मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया लि. या कंत्राटदाराच्या मंजूर निविदा दराच्या आधारे निश्चित केलेली आहे. सदर दर सन २०१३-१४ च्या प्रचलित दरसूचीवर आधारीत असून त्या किंमतीमध्ये वस्तू व सेवा दराचा समावेश नाही.

ब) कास्टींग यार्ड उभारणीसाठीचे बांधकाम व जागेचे भाडे, स्ट्रक्चरल डिझाईन आणि काम पूर्ण झाल्यानंतर दोषदायित्वाचा ५ वर्षाच्या देखभाल कालावधीमध्ये लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री इत्यादी बाबींच्या खर्चाचा राज्य स्तरावरील दरसूचीमध्ये व अंदाजपत्रकिय किंमतीमध्ये समावेश नसल्यामुळे अधिकचा खर्च कंत्राटदारास करावा लागणार आहे.

क) काही बाबींचे वस्तुनिष्ठ आर्थिक विश्लेषण तयार करणे शक्य नाही. सदर काही बाबी खालीलप्रमाणे :-

१. विषयांकित कामाच्या स्थळाचा परिसर वाहतूक कोंडीचा असून त्यामुळे कामाची प्रगती कमी होणे, भरती-ओहोटीचा प्रभाव असलेल्या सुमारे १७ मी. पाण्याच्या खोलीमध्ये काम करण्यासाठी अधिकच्या यंत्रसामुग्री व मनुष्यबळाची आवश्यकता खर्च आणि पावसाळी मोसमादरम्यान काम बंद ठेवावे लागण्याच्या शक्यतेमुळे यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचा क्षमतेपेक्षा कमी वापर होणे इत्यादी कारणास्तव अधिक्याच्या Overhead चा खर्च.

२. नौकावहन गाळा एकच असल्याने विषयांकित कामासाठी आवश्यक असलेल्या Form Work चा पुर्नवापर करणे शक्य नाही ज्यामुळे किंमतीत वाढ अपरिहार्य.

३. कामाच्या प्रस्तावित ठिकाणी स्थानिक मजुरांच्या अनुपलब्धतेमुळे मजुरी खर्चामध्ये वाढ.

४. अंशत: काम दुसऱ्या कंत्राटदाराने केलेले असल्याने त्या अनुषंगाने खर्चामध्ये वाढ.

ड) प्रकल्प सल्लागारांनी राज्यस्तरीय चालू वर्ष २०१८-१९ दरसूची आधारित व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक ०९ मे, २०१७ रोजीच्या सुधारीत ना हरकत प्रमाणपत्रानुसार सुधारीत संरचना (Revised GAD) आधारित गणना केलेली सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत रु.८६.४३ कोटी इतकी आहे. तथापि, ३.२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रस्तावित बांधकामाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय दरसूचीत समाविष्ट नसलेल्या परंतु कामासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश केल्यानंतर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.९३.४९ कोटी (वस्तू व सेवाकर सहित) इतकी येते. या किंमतीच्या आधारे प्रथम लघुत्तम निविदाकारांनी अंतिमत: सादर केलेला रु.१०१.७० कोटी इतक्या किंमतीचा (वस्तू व सेवाकर सहित) आर्थिक देकार ८.७८% इतक्या अधिक्याचा ठरतो.

४.४. उपरोक्त बाबींवर चर्चा करुन कार्यकारी समितीने भविष्यामधील प्रस्तावित कामांच्या अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये राज्य दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या परंतु कामाच्या पूर्णतेसाठी आवश्यक असलेल्या बाबींच्या किंमतीचा समावेश करण्यात यावा अशी सूचना केली.

४.५. प्राधिकरणामार्फत मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंत्राटदारास अदा करण्यात आलेली अनेक कामे विहित कालावधीमध्ये पूर्ण न झाल्यामुळे जनतेस असुविधा व प्राधिकरणास/राज्य शासनास टिकेस तोंड दयावे लागत आहे. सबब, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंत्राटदारास प्राधिकरणामधील निविदा स्पर्धेमध्ये भाग घेण्यास मज्जाव करण्यात यावा अशीही कार्यकारी समितीने सूचना केली.

**निर्णय :-** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र.१३७१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत "भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग

क्र.२२२ व उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्याजवळील सहा पदरी पुलाचे उर्वरित बांधकाम करणे" (ई-निविदा क्र.: ०००१४७६) या कामासाठी मे.टी ॲण्ड टी इन्फ्रा मर्यादित या प्रथम लघुत्तम निविदाकारांनी वाटाघाटी केल्यानंतर कमी केलेल्या रु.१०१,७०,००,०००/- इतक्या किंमतीच्या अंतिम देकारास मान्यता प्रदान करणे तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमजबजावणी करण्यासंबंधी कार्यकारी समितीचे कार्यवृत्त कायम करण्याची प्रतिक्षा न करता आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५: विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाईनाका अंबरनाथ रस्ता ते तळोजा एम.आय.डी.सी दरम्यानच्या तळोजा एम.आय.डी.सी. रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करण्याच्या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मान्यत मिळणे.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त् यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत कटाईनाका अंबरनाथ रस्ता ते तळोजा एम.आय.डी.सी. दरम्यानच्या तळोजा एम.आय.डी.सी रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करण्याचे काम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे. सदर कामाच्या बांधकाम व भूसंपादनासह सुमारे रु. ४५६.० कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दि. २७/०४/२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण तसेच भूसंपादनासाठी लागणा-या खर्चाचा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी समसमान करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तत्वत: मान्यता दिली आहे.

५.२ अतिरीक्त महानगर आयुक्त यांनी या कामाबाबत सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सल्लागाराने तांत्रिक अभ्यास करुन १०.० कि.मी. लांबीच्या सदर रस्त्याचे अंदाजपत्रक ३०.० मी. डी.पी. प्रमाणे अस्तित्वातील ७.५ मी. रुंदीकरण करण्याचा समावेश करुन दोन टप्प्यामध्ये सादर केले असून रस्त्याच्या भागात ३+३ पदरी रुंदीकरण करणे प्रस्तावित केले आहे. सदर रस्त्यामध्ये ३ छोटे पूल व ३३ मो-यांचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

टप्पा-१ मध्ये अस्तित्वातील १५.० मी. रुंदीचे अंदाजपत्रक तयार करुन प्राधिकरणास सादर केले असून सदर टप्पा-१ च्या कामास भूसंपादन करण्याची आवश्यकता नाही. टप्पा-१ च्या कामामध्ये २ पदरी काँक्रिट रस्ता व साईडपट्टी, पर्जन्य जलवाहिन्या व मो-यांचे कामाचा समावेश आहे. सदर टप्पा-१ च्या कामाची अंदाजित किंमत रु. ९०.९२ कोटी (वस्तु व सेवा कर वगळून) असून टप्पा-२ च्या कामाची अंदाजित किंमत रु. १५५.० कोटी (वस्तू व सेवा कर वगळून) आहे.

५.३ **आराखडे व अंदाजपत्रक :** सदर टप्पा-१ चे काम हाती घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सल्लागारामार्फत तयार केला असून या कामाचे आराखडे व रु.९०.९२ कोटी रक्कमेचे (वस्तू व सेवाकर वगळून) सविस्तर अंदाजपत्रक प्राधिकरणास प्राप्त झाले. अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे जिल्हा यांचे सन २०१७-१८ चे मंजूर दरसूचीवर आधारीत आहे. या कामास मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. प्रस्तावित कामासाठी MORTH ने निश्चित केलेले मानके (Specifications) निविदामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

५.४ **ई-निविदा :** सदर कामाचे रु. ९०,९२,८४,८८९/- (वस्तू व सेवा कर वगळून) इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस B-१ (टक्केवारी) स्वरुपात ई-निविदा सुचना मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये दि. १०/०९/२०१८ रोजी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या प्रस्तावित रस्ता पूर्ण करण्याचा कालावधी पावसाळयासह १८ महिने आहे. कंत्राटदारांची संकेतस्थळावर दिलेली माहिती, उघडण्यात आलेल्या निविदा व लघुत्तम देकार इ. तपशिल सादर करण्यात आला आहे. विषयांकित कामासाठी विहित मुदतीत ५ निविदाकारांनी स्वारस्य दाखविले व ई-निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत निविदा संच फी व ईसारा रक्कम अदा करुन ५ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. एकूण ५ कंत्राटदारांच्या निविदा दि.२८/११/२०१८ रोजी उघडण्यात आल्या.

प्राप्त निविदांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

**तक्ता-१ :-**

| अ क्र | निविदा धारकाचे नाव | मे. अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | मे. एन.ए. कंस्ट्रक्शन प्रा.लि. | मे. डी.पी. जैन आणि कं. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वस्तू व सेवा करासह अंदाजपत्रकीय रक्कम | १०१८३९९०७६ | १०१८३९९०७६ | १०१८३९९०७६ | १०१८३९९०७६ | १०१८३९९०७६ |

| अ क्र | निविदा धारकाचे नाव | मे. अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | मे. एन.ए. कंस्ट्रक्शन प्रा.लि. | मे. डी.पी. जैन आणि कं. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | वस्तू व सेवा कर वगळून निविदेतील रक्कम | ९०९२८४८८९ | ९०९२८४८८९ | ९०९२८४८८९ | ९०९२८४८८९ | ९०९२८४८८९ |
| ३ | निविदा धारकाने वस्तू व सेवा करासह सादर केलेली रक्कम | ९१०००३२२४ +०.०७९ % | ८३२८०४९३७ - ८.४११ % | ८९६२८२११५ -१.४३ % | १०७२९५६१६९ +१८ % | ७६८२५४८०३ -१५.५१ % |
| ४ | तुलनात्मक % / रक्कम (१२% वस्तू व सेवाकरासह अंदाजपत्रकीय रक्कम व निविदा धारकाने सादर केलेली रक्कम) | -१०.६४ % ९१०००३२२४ | -१८.२२४ % ८३२८०४९३७ | -११.९९ % ८९६२८२११५ | +६ १०७२९५६१६९ | -२४.५६ % ७६८२५४८०३ |
| ५ | निविदेतील अटीनुसार अतिरिक्त सुरक्षा रक्कम | १६७०१७४५ | ९३८९६३९५ | ३०४५०१३२ | - | १५८४६२८९६ |
| ६ | निविदाधारकाने प्रत्यक्ष भरलेली अतिरीक्त् सुरक्षा रक्कम | १६७४२५०० | ९४०००००० | ३०५५२००० | - | ६६३००००० |

**तक्ता -२ :-**

निविदेतील कलम १.६.२/पान क्र. १६ प्रमाणे व निविदा बद्दल प्रपत्र Common Set of Deviation प्रमाणे अतिरिक्त सुरक्षा रक्कमेचा भरणा.

जर निविदाकाराने निविदा दर अंदाजपत्रकामधील रक्कम वस्तू व सेवाकरासह कमी दराने भरली असल्यास, अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Performance Security) पुढीलप्रमाणे असेल : -

अतिरिक्त सुरक्षा रक्कम रु. १०१,८३,९९,०७६/- (रु. ९०,९२,८४,८८९/- +१२% वस्तू व सेवा रु. १०,२१,१४,१८७/-) इतक्या रक्कमेवर गणना करावी.

| अंदाजित रक्कमेवर सादर केलेला निविदा दर | अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Performance Security) |
|---|---|
| ० % ते १.० कमी दराने | निरंक |
| १ ते १०.० % कमी दराने | निविदेतील अंदाजित रक्कमेच्या १ % |
| १०.० % पेक्षा कमी दराने | % सुरक्षा अनामत रक्कम = (% निविदा दर (-) १० % + १%)<br>उदा. जर निविदा १४% कमी दराची असेल तर अतिरिक्त् सुरक्षा रक्कम (Performance Security) (१४-१० ) + १ = निविदा रक्कमेच्या ५% भरावी लागेल. |

वरील तक्त्यामध्ये मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांनी निविदेतील अंदाजित रक्कमेपेक्षा १०% पेक्षा कमी दराने निविदा भरली असून निविदेतील अटीनुसार अतिरिक्त निविदा सुरक्षा रक्कम रु.१५,८४,६२,८९६/- ऐवजी रु.६,६३,००,०००/- भरली असल्यामुळे निविदा शासन परिपत्रक क्र.सीएटी/२०१७/प्रक्र०८/ईमा-२/मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ दि.२७ सप्टेंबर, २०१८ मधील खालील नमूद अनुच्छेद क्र.५.१.१ चा भंग करते असे स्पष्ट झाले:-

"५.१.१ अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) भरणे.

कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्के पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगिरी सुरक्षा ठेव रक्कमेची बँक प्रतिभूती हमी निविदेसोबत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. निर्धारित रक्कमेपेक्षा कमी रकमेची बँक प्रतिभूती हमी सादर केल्यास अथवा आवश्यक बँक प्रतिभूती हमी सादरच न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात यावी".

त्यानुसार निविदा समितीने दिनांक १९.१२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांची निविदा अपात्र ठरविली. तसेच मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांची रु.८३,२८,०४,९३७/- वस्तू व सेवा करासह (-) १८.२२४% कमी दराची निविदा (अंदाजपत्रकीय रक्कम रु.१०१,८३,९९,०७६/- वस्तू व सेवा करासह) प्रथम लघुत्तम निविदा ठरवून मान्यतेसाठी शिफारस केली.

याबाबत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती आणि इतर सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेदरम्यान काही सदस्यांनी याबाबत अपात्र ठरलेल्या निविदेचा दर (-) २४.५६ % असून प्रथम लघुत्तम ठरविण्यात आलेल्या निविदेचा दर (-) १८.२२४ % आहे. यामध्ये एकूण रु. ६,४५,५०,१३४/- इतकी तफावत असल्यामुळे प्रथम लघुत्तम निविदाकार मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांनी सदर (-) २४.५६ % कमी दराने कामास मान्य केल्यास प्राधिकरणाची रु. ६,४५,५०,१३४/- इतकी बचत होईल. प्रथम लघुत्तम निविदाकार मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांचेशी याबाबत विचारणा करुन त्यांनी वाटाघाटीने रु. ७६,८२,५४,८०३/- (रु. शहात्तर कोटी ब्याऐशी लक्ष चौपन्न हजार आठशे तीन मात्र) पेक्षा कमी दराने सुधारीत देकार सादर केल्यास समितीने निविदा स्विकृत केल्याचे समजण्यात यावे अथवा फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

**निर्णय: त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र.१३७२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७६ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाईनाका अंबरनाथ रस्ता ते तळोजा एम.आय.डी.सी दरम्यानच्या तळोजा एम.आय.डी.सी. रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करण्याच्या कामाच्या मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांनी वाटाघाटीने रु. ७६,८२,५४,८०३/- (रु. शहात्तर कोटी ब्याऐंशी लाख चौपन्न हजार आठशे तीन मात्र) पेक्षा कमी दराने सुधारीत देकार सादर केल्यास समितीने निविदा स्विकृत केल्याचे समजण्यात यावे अथवा फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर होण्याची प्रतिक्षा न करता कामाचे स्विकृती पत्र व कार्यारंभ आदेश याबाबत पुढील कार्यवाही त्वरीत करावी.

**" आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या सर्व फेरबदलासह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील संचालक (प्रणाली) या पदावरील नेमणूकीस मान्यता देण्याबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्ग अग्रक्रमाने राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता विचारात घेता प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ठराव क्रमांक १३८२ अन्वये सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत तांत्रिक पदांकरीता निवड समिती निर्माण करण्यात आली आहे. प्रसंगानुरुप समितीमध्ये आणि/अथवा समितीच्या सदस्यांमध्ये बदल जसे की, नवीन सदस्य अंतर्भूत

करणे आणि/अथवा गठीत समितीतील सदस्य नामनिर्देशित करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात आले आहेत. कार्यकारी समितीने महानगर आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन "संचालक (प्रणाली)" या पदावरील नेमणूकीकरीता प्राधिकरणाचे नियुक्ती प्राधिकारी या नात्याने महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित करण्यात आली. निवड समितीने शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, पात्रता व योग्यता या सर्व बाबीचा विचार करुन एकमताने "संचालक (प्रणाली)" या पी.बी.-IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे रु. १००००/- वेतनश्रेणीतील पदावर पश्चिम रेल्वे कार्यालयाचे श्री. कुलवेंद्र सिंह कपूर, CEE/RS यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेची शिफारस केली आहे. "संचालक (प्रणाली)" वेतनश्रेणी पी.बी.-IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे रु. १०,०००/- हे पद विभाग प्रमुख व त्यावरील दर्जाचे असल्याने सदर पदावर नेमणूक करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

**<u>निर्णय</u> : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**<u>ठराव क्र.१३७३</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकस प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार "संचालक (प्रणाली)" पी.बी.-IV ३७४००-६७००० + ग्रेड पे १०,०००/- या वेतनश्रेणीतील पदावर श्री. कुलवेंद्र सिंह कपूर यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूकीस मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७</u> : <u>प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे</u>**

७.१. महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. याबाबत चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाच्या आयकराबाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, आयकर विभागाने कर निर्धारण करुन सन २०१७-१८ पर्यंत सुमारे ८००० कोटीची आयकर परिगणना केलेली आहे. याबाबत प्राधिकरणाने अपिल केलेले आहे. एम.आय.डी.सी., सिडको यांना

आयकरातून सुट मिळाल्याचे समजते. याच आधारावर प्राधिकरणास ही आयकरातून सुट मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत, सुट न मिळाल्यास न्यायालयातून सुट मिळविण्यासाठी दावा दाखल करण्यात येईल. यावर शासनाने प्राधिकरणास शासनाचा एक भाग आहे असा अध्यादेश काढल्यास प्राधिकरणास पुर्णत: आयकरातून सुट मिळू शकते. नगर विकास विभागाकडे याबाबत प्रस्ताव सादर करावा, असे मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सांगितले.

**<u>निर्णय:</u>** **त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली:-**

**<u>बाब क्र.८</u> : शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी सक्षम अधिकारी व अपिलीय प्राधिकारी ठरविण्याबाबत.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० ऑगस्ट, १९९५ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.६४२ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम ५ मधील तरतूदीनुसार विभाग प्रमुख वगळून इतर सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या नेमणूकीचे आधिकार कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना प्रदान केलेले आहेत. तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ३ एप्रिल, १९९६ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ६६३ अन्वये प्राधिकरणातील अधिकारी (विभाग प्रमुख वगळून) व कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना प्रदान केलेले आहेत. महानगर आयुक्त हे विभागीय चौकशीसह शिस्तभंगाची कार्यवाही (विभाग प्रमुख वगळून) करु शकतात. त्यामुळे शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून महानगर आयुक्त आहेत. त्याचप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही झालेल्या कर्मचारी/अधिका-यास महानगर आयुक्तांनी दिलेली शिक्षा मान्य नसल्यास, न्याय मागण्यासाठी (अपिल करण्यासाठी) अपिलीय प्राधिकारी आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम क्र.१८ मधील तरतूदीनुसार अपिलीय प्राधिकारी निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुसार दिनांक ०४ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३३ व्या बैठकीतील ठराव क्र. ११८७ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (५) तसेच बॉम्बे जनरल क्लॉज ॲक्टच्या कलम १६ मधील तरतूदीनुसार कार्यकारी समितीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचारी/अधिका-यांवरील (विभाग प्रमुख वगळून) शिस्तभंगविषयक कार्यवाहीसंबंधात महानगर आयुक्तांनी पारित केलेल्या आदेशाबाबतीत अपिलीय प्राधिकारी म्हणून शासनाचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि श्री. द.म.सुकथनकर,

सदस्य, कार्यकारी समिती यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली होती. श्री. सुकथनकर यांचे सदस्यत्व खंडीत करण्यात आल्यामुळे त्यांच्याऐवजी एका सदस्याचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

८.२ चर्चेदरम्यान, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी श्री.द.म.सुकथनकर यांच्या जागी श्री.जयंत कुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांची नेमणूक करुन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग व नव्याने नामनिर्देशित केलेले श्री.जयंत कुमार बाँठिया हे अपिलीय प्राधिकारी राहतील असे निर्देश दिले.

**निर्णय:** **चर्चेनंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र.१३७४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (५) तसेच बॉम्बे जनरल क्लॉज ॲक्टच्या कलम १६ मधील तरतूदीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचारी / अधिका-यांवरील (विभाग प्रमुख वगळून) शिस्तभंग विषयक कार्यवाहीसंबंधात महानगर आयुक्तांनी पारित केलेल्या आदेशाबाबतीत **"अपिलीय प्राधिकारी"** म्हणून शासनाचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि श्री.जयंत कुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांच्या समितीस नियुक्त करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे".

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********